महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला,
लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९,
दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००, वेबसाईट : www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ दिनांक :

**महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.** No 12720 **दिनांक** 13 DEC 2024

**विषय:-** जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये प्रसिध्द तंत्रज्ञ-३ पदाच्या शैक्षणिक अर्हतेत आय.टी.आय.व्यवसाय आणि प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी यांच्या शैक्षणिक अर्हतेत ऑटोमोबाईल अभियांत्रिकी पदवी / पदविका यांचा समावेश करण्याबाबत.

महानिर्मिती कंपनीकडून तंत्रज्ञ-३ यांची रिक्त पदे भरण्यासाठी सरळसेवा भरतीतर्गत जाहिरात क्र.०४/२०२४ दि.२६.११.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील जाहिरातीत, सामान्य (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) उमेदवारांसाठी, १४ व्यवसायांपैकी एका व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) नियमित (रेग्युलर) कोर्स उत्तीर्ण / राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संबंधित व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र (NCTVT)/ (MSCVT) धारण करणे आवश्यक असल्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता / आय.टी.आय.व्यवसायात पुढील व्यवसायांचा (Trade) समावेश करण्यात येत आहे:-

१) डिझेल मॅकेनिक
२) मोटर मॅकेनिक
३) मशिनिस्ट ग्राईंडर

तसेच महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अभियांत्रिकी पदवी / पदविका अभ्यासक्रमात **"ऑटोमोबाईल अभियांत्रिकी"** पदवी / पदविका या शैक्षणिक अर्हतेचा समावेश करण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त शैक्षणिक अर्हतेतील सुधारणेबाबत सामान्य (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) व महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्त अभियांत्रिकी पदवी / पदविकाधारक उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच सध्याचे सुधारपत्र प्रसिध्द करण्यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केला असला तरी देखील उमेदवारांनी वरील सुधारीत शैक्षणिक अर्हतेस अनुसरुन नविन अर्ज सादर करणे आवश्यक असेल. उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी की, त्यांनी सादर केलेल्या अर्जांपैकी नविनतम अर्ज (Latest Online Application) भरती प्रक्रियेसाठी विचारात घेण्यात येईल.

तसेच उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी कालावधी मिळावा आणि ते अर्ज सादर करण्याच्या संधीपासून वंचित राहू नये, म्हणून अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकात वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २६.१२.२०२४ ऐवजी दिनांक १०.०१.२०२५ असा असेल.

याशिवाय जाहिरातीत नमूद इतर सर्व बाबी (सर्वसाधारण अटी, आरक्षणासंबंधीच्या अटी / नियम व इतर) अबाधीत राहतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)

C:\Users\dell\Downloads\Sudharpatra & Circular.doc

Scanned with OKEN Scanner